




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १८३ * नांदेड * गुरूवार, दि. १० जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## गुजरातच्या वडोदरातील गंभीरा पूल कोसळून १० जणांचा मृत्यू



**वडोदरा (प्रतिनिधी)**– गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. बुधवारी सकाळी ७:३० वाजता महिसागर नदीवरील ४३ वर्षे जुना गंभीरा पूल कोसळला, यात १० जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. हा पूल मध्य गुजरात आणि सौराष्ट्राला जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता.

या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसेच, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनीही मृतांच्या वारसांना ४ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपये देण्याची घोषणा केली आहे.

वडोदरा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक रोहन आनंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलाचा १०-१५ मीटर लांबीचा एक स्लॅब कोसळल्यामुळे दोन ट्रक, एक ईको व्हॅन, एक पिकअप व्हॅन आणि एक ऑटोरिक्षा नदीत कोसळली. वडोदरा कलेक्टर अनिल धमेलिया यांनी सांगितले की, बचाव पथकांनी आतापर्यंत ९ मृतदेह बाहेर काढले आहेत आणि ६ जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. जखमींना वडोदरा येथील एसएसजी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने तातडीने बचाव कार्य सुरू केले. मात्र, काही स्थानिकांनी प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप केला आहे. त्यांच्या मते, पुलाची दुरवस्था असूनही त्याच्या दुरुस्तीचे प्रस्ताव वारंवार दुर्लक्षित केले गेले. यावर गुजरातचे आरोग्य मंत्री ऋषिकेश पटेल यांनी सांगितले की, १९८५ मध्ये बांधलेल्या या पुलाची वेळोवेळी देखभाल केली जात होती, परंतु दुर्घटनेच्या कारणांचा सखोल तपास केला जाईल. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या घटनेच्या चौकशीसाठी तातडीने तज्ज्ञांची एक समिती नेमली असून, त्यांना अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## २६ ऑगस्टपासून नांदेडपर्यंत धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसला असणार २० डब्बे

**नांदेड (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जालना वंदे भारत एक्स्प्रेसचा विस्तार हजूर साहिब नांदेडपर्यंत करण्यात आला आहे. या विस्तारित गाडीचे उद्घाटन दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात येणार आहे. याकरिता एक उद्घाटन विशेष गाडी २६ ऑगस्टला चालविण्यात येईल. या रेल्वेगाडीला पुर्वी असणाऱ्या ८ डब्ब्यांमध्ये वाढ करून २० डब्बे असणार आहेत.

भारतीय रेल्वेचा अभिमान आणि भारताची स्वदेशी सेमी-हायस्पीड ट्रेन वंदे भारत एक्सप्रेसने - महाराष्ट्रातील मराठवाड्यातून आपला पहिला प्रवास दि. ३० डिसेंबर, २०२३ पासून सुरु केला होता. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३० डिसेंबर, २०२३ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जालना ते मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला जोडणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन केले होते.



या विस्तारित गाडीची नियमित सेवा दि. २७ ऑगस्ट पासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हजूर साहिब नांदेड आणि दि. २८ ऑगस्टपासून हजूर साहिब नांदेड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अशी सुरु होईल.

गाडी संख्या २०७०६ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्स्प्रेस ही गाडी दि. २७ ऑगस्ट २०२५ पासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरून गुरुवार वगळता रोज दुपारी १.१० वाजता सुटेल आणि दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, औरंगाबाद, जालना आणि परभणी रेल्वे स्थानकांवर थांबून हजूर साहिब नांदेड येथे रात्री १०.५० वाजता पोहोचेल.

गाडी संख्या २०७०५ हजूर साहिब नांदेड - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्स्प्रेस ही गाडी दि. २८ ऑगस्ट २०२५ पासून हजूर साहिब नांदेड स्थानकावरून बुधवार वगळता रोज सकाळी ५.०० वाजता सुटेल आणि परभणी, जालना, औरंगाबाद, मनमाड, नाशिक रोड, कल्याण, ठाणे आणि दादर रेल्वे स्थानकांवर थांबून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुपारी २.२५ वाजता पोहोचेल.

ही गाडी हजूर साहिब नांदेड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई हे अंतर ९ तास २५ मिनिटांत पूर्ण करेल. ज्यात एक्झिक्युटिव्ह क्लास आणि चेअर कार मिळून एकूण २० डब्बे असतील. जालना ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये ८ डब्बे होते. त्यात वाढ करून २० डब्बे करण्यात आले आहेत.

## राजस्थानच्या चुरुमध्ये वायूसेनेचं विमान कोसळलं; २ मृतदेह आढळल्याची माहिती

**चुरु (प्रतिनिधी)**– राजस्थानच्या चुरुमधील रतनगढ भागातील भानुदा गावात बुधवारी भारतीय हवाई दलाचं एक विमान दुर्घटनाग्रस्त झाल्याची माहिती मिळाली आहे. विमानाच्या ढिगाऱ्यामध्ये एक मृतदेह सापडला आहे. हा मृतदेह विमानाच्या पायलटचा असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच वायुसेनेचं एक पथक घटनास्थळी रवाना झालं आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार आकाशात मोठा आवाज झाल्यानंतर शेतामध्ये आग आणि धूर पाहायला मिळाला आहे.

विमान क्रॅश झाल्यानंतर घटनास्थळी दोन मृतदेह आढळल्याची प्राथमिक माहिती आहे. मृतदेहाची स्थिती देखील खराब असल्याची माहिती आहे. प्रशासनाकडून मृताची ओळख पटवण्याचं काम सुरु आहे. विमान दुर्घटनेची माहिती मिळताच रतनगढमधील स्थानिकांनी त्या ठिकाणी धाव घेतली आहे. भारतीय हवाई दलातील दुर्घटनाग्रस्त विमान जग्वार असल्याची प्राथमिक माहिती आहे.

गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार विमान क्रॅश झाल्यानंतर शेतामध्ये आग लागली होती. गावकऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला होता. आग विझवण्यास सुरुवात केल्यानंतर एक मृतदेह सापडला, त्यानंतर आग विझवण्याचं काम सुरुच ठेवल्यानंतर दुसरा मृतदेह देखील सापडल्याची माहिती आहे. (पान ६ वर...)

## तुकडेबंदी कायदा रद्द करणार, महसूल मंत्र्यांची विधीमंडळात घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)**– महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरूवारी विधिमंडळात एक मोठी घोषणा केली आहे. सरकार तुकडेबंदी कायदा रद्द करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. दरम्यान, महसूलमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयाचं विरोधकांनी देखील स्वागत केलं आहे. हा कायदा रद्द केल्यामुळे ५० लाख शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचं सरकारने म्हटलं आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपल्याला १ जानेवारी २०२५ ही कट ऑफ डेट ठेवून पुढे जावं लागेल. कायदा रद्द केल्यानंतर १ जानेवारी २०२५ पासूनच्या व्यवहारांसाठी नव्या नियमांची अंमलबजावणी केली जाईल. त्यानंतर मात्र आपल्याला युडीसीपीआर (एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमन) प्रमाणे काम करावं लागेल. म्हणजेच नियोजन प्राधिकरणाच्या नियमाने जावे लागेल. त्यामुळे आता पुढच्या काळात अवैध बांधकामं आणि प्लॉटिंग रेग्युलराईज (नियमित) करता येणार नाहीत. १ जानेवारीपर्यंत अनेक ठिकाणी अवैध बांधकामं नियमित करण्यात आली आहेत.

## शिक्षकांच्या मागण्या सरकारकडून मान्य

### २० टक्के वाढीव पगार लवकरच खात्यात जमा होणार

**मुंबई (प्रतिनिधी)**– आझाद मैदानावरील शिक्षकांच्या आंदोलनाला यश मिळाले असून, विधिमंडळाचं अधिवेशन संपल्यानंतर विनाअनुदानित शिक्षकांच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा होईल, असं आश्वासन सरकारने दिले आहे. आझाद मैदानात शिक्षकांच्या आंदोलनात जाऊन मंत्री गिरीश महाजन यांनी ही घोषणा केली.

राज्यातील विनाअनुदानित शिक्षकांना देण्यात आलेले आश्वासन सरकारने पूर्ण करावे, शाळांना २० टक्के टप्प्याटप्याने अनुदान यासह इतर मागण्यांसाठी शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केलं होतं. त्यांच्या या मागण्या सरकारने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. या संदर्भात गिरीश महाजन म्हणाले की, १८ तारखेला पावसाळी अधिवेशन संपेल. त्यावेळी तुमच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा झालेला असेल. मुख्यमंत्री हे शिक्षकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहेत. त्याआधी शिक्षकांच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. चर्चा सकारात्मक झाल्याचं महाजन यांनी सांगितलं.

गिरीश महाजन म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शिक्षकांसबंधी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मात्र थोड्या आर्थिक अडचणींमुळे मधल्या काही काळातील हफ्ते देण्यास उशीर झाला. मी तुम्हाला सांगतो की तुम्ही कुणावरही विश्वास ठेऊ नका, तुमचे काम आम्हीच करणार आहोत. पुरवणी मागण्यांमधे आज मांडता आले नाही, मात्र इथून पुढे पगाराची तारीख टळणार नाही, असे ते म्हणाले.

## मराठी मोर्चा प्रकरणात पोलीस आयुक्तांची तडकाफडकी बदली

### मधुकर पांडे यांच्या जागी निकेत कौशिक नवे आयुक्त

**मिरा भाईंदर (प्रतिनिधी)**– मराठी मोर्चाला परवानगी नाकारण्याच्या पार्श्वभूमीवर वादात सापडलेले मिरा भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. गृह विभागाने बुधवारी त्यांना पदावरून हटवत त्यांची नियुक्ती अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म्हणून केली आहे. त्यांच्या जागी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस महासंचालक निकेत कौशिक यांची मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मिरा रोड येथे स्थानिक व्यापाऱ्यांनी हिंदी भाषिकांच्या समर्थनार्थ मोर्चा काढला होता. या मोर्चाला उत्तर म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मंगळवारी मराठी भाषिकांचा भव्य मोर्चा काढण्याचे नियोजन केले होते.

## माहूर येथील राजश्री लॉजच्या मालकावर रजिस्टरमध्ये नोंद न ठेवल्याने कारवाई

**माहूर (प्रतिनिधी)**– शहरातील बस स्थानकाजवळ असलेल्या राजश्री लॉजमध्ये अवैधरित्या आलेल्या प्रवासी जोडप्याला कोणत्याच रजिस्टरला नोंद न करता प्रवेश देणे चांगलेच महागात पडले आहे. माहूर पोलिसांनी मंगळवारी राजश्री लॉजचे मालक व कर्मचाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली आहे. या कारवाईने माहूर शहरातील प्रसिद्ध, निवडक लॉज व हॉटेलां मध्ये अवैध व्यवसायासह अवैध जोडप्यांच्या गैरकृत्याला चालना देणाऱ्या चालकांमध्ये धडकी भरली आहे.

माहूर हे तीर्थक्षेत्राचे व तालुक्याचे ठिकाण असल्याने येथे भाविकांसह बाहेर गावाहुन येथे येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर महाविद्यालयांसह शाळा असल्याने हजारो विद्यार्थ्यांचा नित्य वावर असतो. तसेच दररोज हजारो लोक याच रस्त्यावरुन ये-जा करीत असतात, विदर्भातील आर्णी व पुसद या शेजारच्या तालुक्यातून देखील प्रेमीयुगल देखील येथील लॉजमध्ये येवून राहत असल्याची चर्चा होती. विशेष म्हणजे रुम साठी आधारकार्ड पुरावा म्हणून घेण्यात येत नसल्याने हॉटेल चालकाला रूम भाडे दाम दुप्पट मिळत होते.


अशातच काल मंगळवारी माहूर पोलिसांनी भरवस्तीतील राजश्री लॉज वर धाड टाकली असता एका रूममध्ये एक २४ वर्षीय मुलगी तर दुसऱ्या रूममध्ये एक मुलगी व मुलगा यांचे आधार कार्ड मिळालले नाही. यावरून पोलीस अंमलदार ज्ञानोबा खंदारे यांच्या फिर्यादीवरून लॉज मालक गणेश दयाराम जोशी (वय ४२) आणि व्यवस्थापक अनिल माधव गंजेवार (वय २७) राहणार नखेगाव तालुका माहूर या दोघांविरुद्ध शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार चौधरी करत आहेत.

## मराठी पत्रांना आता मराठीतूनच उत्तर मिळणार, केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– राज्यात सध्या मराठी विरुद्ध हिंदी असा वाद सुरु आहे. अशातच आता केंद्रीय गृह मंत्रालयाने निर्णय घेतला आहे. आता मराठी भाषेत पाठवलेल्या पत्रांना मराठीतूनच उत्तर दिलं जाणार आहे. संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत समितीचे निमंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी ही माहिती दिली आहे.

याबाबत बोलताना डॉ. दिनेश शर्मा म्हणाले की, राजभाषा समिती देशातील प्रादेशिक भाषांना चालना देणे, हिंदी भाषेला सहयोगी भाषा म्हणून प्रस्थापित करणे यासाठी काम करत आहे. सध्या गृह मंत्रालयातील संपूर्ण कामकाज हिंदी भाषेत होत आहे, मात्र यापुढे मराठी भाषेतील पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येईल. तसेच तामिळ भाषेतील पत्रांना तामिळमधूनच उत्तर दिले जाईल.'

पुढे बोलताना सीपी राधाकृष्णन म्हणाले की, मी झारखंडमध्ये राज्यपाल असताना हिंदीशिवाय लोकांशी संवाद साधता येत नव्हता. मला आज आपल्याला हिंदी पूर्ण समजते. मी राज्यातील विद्यापीठांमध्ये जर्मन, जपानी, मँडरिन, या विदेशी भाषा देखील शिकविल्या जाव्या अशा सूचना विद्यापीठांना केल्या आहेत.



## कामगार, कर्मचाऱ्यांच्या देशव्यापी संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मोर्चातील घोषणांनी नांदेड दणाणले; बँक, महावितरणसह शासकीय कार्यालयांमध्ये शुकशुकाट




**नांदेड (प्रतिनिधी)**– कामगार कायद्याच्या चार संहिता मागे घ्यावे, जनसुरक्षा विधेयक रद्द करा, शेती उद्योग वाचवा या व इतर मागण्यांसाठी विविध कामगार, संघटनांनी पुकारलेल्या देशव्यापी संपाला बुधवार, दि. ९ जुलै रोजी नांदेडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कामगार, कर्मचारी संयुक्त कृती समितीने काढलेल्या भव्य मोर्चातील घोषणांनी शहर दणाणले होते. संपात बँक, वीज, आरोग्य, महसूल, वन आदी शासकीय विभागातील कामगार, कर्मचारी सहभागी झाल्याने शासकीय कार्यालयांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

केंद्र सरकारच्या शेतकरी व कामगार विरोधी धोरणाच्या निषेधार्थ आयटक, इंटक, सीटू, हिंद मजदूर सभा यासह देशातील प्रमुख अकरा कामगार, कर्मचारी संघटनांनी ९ जुलैच्या देशव्यापी संपाची हाक दिली होती. नांदेड जिल्हा कामगार- कर्मचारी संयुक्त कृती समितीच्यावतीने महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात कंत्राटी सफाई, सामाजिक व वन, विडी कामगार, आशा व गट प्रवर्तक, शालेय पोषण आहार, ग्राम पंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, अंगणवाडी, एसटी, आरोग्य विभागातील कर्मचारी, एमआर संघटना, वीज, बँक, विमा, इमारत व बांधकाम, घरेलू कामगार, औद्योगीक कामगार, देवस्थान कामगार व सर्व योजना कर्मचाऱ्यांसह अनेक क्षेत्रातील मंडळातील कामगार, कर्मचारी सहभागी झाले. कंत्राटीकरण रद्द करा, कंत्राटी कामगारांना सेवेत सामावून घ्या, चार कामगार संहिता वापस घ्या, जनसुरक्षा विधेयक रद्द करा, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा, शेत मालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव द्या आदी मागण्या करण्यात आल्या. या मोर्चाचे रुपांतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सभेत करण्यात आले.

यावेळी कॉ.विजय गाभणे, कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ.बी.के.पांचाळ, कॉ.शिवाजी फुलवळे, कॉ.गंगाधर गायकवाड, कॉ.उज्वला पडलवार, एसटी कामगारांचे नेते गुणवंत मिसलवाड, मनपा कामगाराचे नेते गणेश शिंगे, आशा वकर्सचे सिध्दार्थ थोरात, कॉ.अब्दुल गफार, सफाई कामगार नेत्या कॉ.वैशाली धुळे, कॉ.देवराव नारे, कॉ.दिगंबर घायाळे, कॉ.अब्दुल वसीम, कॉ.लता गायकवाड, कॉ. करवंदा गायकवाड, एसएफआयच्या राज्य सचिव मिना आरसे आदींची यावेळी भाषणे झाली. या मोर्चाला राज्य सहकारी समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण नरमवार यांनी पाठिंबा व्यक्त केला. यावेळी मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन संयुक्त व विविध क्षेत्रातील कामगार, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदने दिली.

## थोडक्यात...

### गायत्री बंडावारचे सीए परीक्षेत घवघवीत यश

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – सीए परीक्षेत नरसी येथील गायत्री नागेश बंडावार हिने यश संपादन केले आहे.



वयाच्या २० व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात तिने ही परीक्षा उत्तीर्ण केली. ही परीक्षा उत्तीर्ण होणारी गायत्री बंडावार ही नरसी शहरातील पहिलीच मुलगी ठरली आहे. त्यामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय वडील नागेश बंडावार, आई बिंदु नागेश बंडावार तसेच गुरुजनांना दिले असून तिच्या या यशाबद्दल दिनेश रेवनवार, रेखा बोराळकर, दत्ता बोराळकर यांच्यासह अनेकांनी कौतुक करून उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

### गुन्हेगार चिंध्या सहा महिन्यांसाठी हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील सिडको- हडको, बळीरामपूर परिसरात सातत्याने गुन्हे करणारा राजू उर्फ चिंध्या धनकवाड याला सहा म हिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेगार राजु उर्फ चिंधी म हाजन धनकवार (वय २९, रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड) याच्याविरुध्द कलम ५६ (१) (ब) महाराष्ट्र पोलीस अधिनियमप्रमाणे हद्दपार प्रस्ताव बनवुन पोलीस अधीक्षक नांदेड यांच्या मार्फतीने उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड यांना सादर केला होता. सदर हद्दपारीचा आदेश त्यास देवुन नांदेड जिल्ह्यातून निघून जाण्यास सांगितले आहे.

# चोरंबा येथील विद्यार्थ्यांनी बनवले पर्यावरणपूरक सीडबॉल




**हदगाव (प्रतिनिधी)**– हदगाव तालक्यातील चोरंबा येथील जिल्हा परिषद शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. या वर्षांपासून सीडबॉल निर्मिती व रोपणाचा उपक्रम राबविला आहे. सीताफळ रामफळ, जांभूळ, लिंब, चिकू अशा अनेक फळझाडांच्या बियांचे सीडबॉल तयार करण्यात आले आहेत.

प्रदूषण, ग्लोबल वार्मिंग कमी पर्जन्यमान इत्यादी संभाव्य धोके टाळण्यासाठी वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन आणि वृक्ष संगोपन करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी 'चला ऑक्सिजन पेरूया' उपक्रम राबविण्यात आला.

मुख्याध्यापक बालाजी पेंटेवार, पदवीधर शिक्षक डि. के. पिन्नलवार, ज्योती धुतमल, तसलीम शेख, बाबासाहेब सोनाळे, रविंद्र गंदेवार, मंगल व्यव्हारे, सुचिता कांबळे या शिक्षकांनी मुलांना सोबत घेवून सीडबॉल तयार करून वृक्षसंवर्धनाचे उल्लेखनीय कार्य करत आहेत.

हदगाव तालक्यातील शंभर घरांचे छोटे गाव असून या ठिकाणी नियमित विविध उपक्रम राबविले जातात. जिल्हा परिषदेची प्रा. शा. चोरंबा नां येथे या वर्षांपासून सीडबॉल निर्मिती व रोपणाचा उपक्रम राबविला जात आहे. शाळेच्या वतीने सीताफळ रामफळ, जांभूळ, लिंब, चिकू अशा अनेक फळझाडांच्या बिया जमा करण्यात आल्या होत्या. काळी माती शेणखताचे एकत्रित मिश्रण करून त्यात बिया टाकून त्याचे सीडबॉल (मातीचे गोळे) करून वाळवले व पावसाळ्याच्या सुरुवातीला सीडबॉल उजाड माळरानावर रुजविण्यासाठी याचा वापर करण्यात आला.

# राजीव गांधी महाविद्यालयात 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऊस लागवड'यावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**मुदखेड (प्रतिनिधी)**– येथील राजीव गांधी महाविद्यालय आणि भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना, लक्ष्मी नगर तालुका अर्धापूर जिल्हा नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऊस लागवड' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.



चर्चासत्राच्या सुरुवातीला माजी केंद्रीय गृहमंत्री कै. डॉ. शंकरराव चव्हाण आणि कै. सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये वाढत्या वापराचे आवश्यकता, जमीन सुपीक बनवणे आणि उत्पादनवाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. शेतकऱ्यांनी या नव्या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन शेतीच्या उत्पादकतेत वाढ साधावी, असे त्यांनी आवाहन केले.

राजेश रामनगिरे यांनी चर्चासत्राचे बीजभाषण केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून हवामानाचा अंदाज, मातीची माहिती, पाण्याचा योग्य वापर व खतांचे योग्य नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी पाण्याच्या कमीत कमी वापरावर भर दिला आणि त्याच्या माध्यमातून खत पुरवठा करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. कैलास दाड यांनी शेतकऱ्यांना ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. चांगल्या प्रतीच्या उसाच्या बेण्याच्या वापरामुळे उसाची वाढ आणि वजन वाढीस मदत होते, असे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात भाऊराव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण यांनी मराठवाड्यातील जमिनीची सुपीकता वाढवण्यावर भर देण्याचे आवाहन केले. त्यांनी शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व नवतंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये सुधारणा करावी. या भागातील शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावरील नव्या प्रयोगाला एकत्रितपणे सुरुवात करण्याचे आवाहन केले. या चर्चासत्रात सौर ऊर्जाचा वापर उसाचे बेणे, कामगार वर्ग इत्यादी विषयावर शेतकऱ्यांनी वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले. या विविध प्रश्नांवर समाधानकारक चर्चा करण्यात आली.

अंतर्गत गुणवत्ता आणि पक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. राहुल धावारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वनस्पती विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश उमाटे यांनी आभार मानले. या चर्चासत्राला नांदेड जिल्ह्यातील जवळपास शंभर शेतकरी उपस्थित होते. या चर्चासत्रात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर तालुक्यातील रस्ते विकासासाठी १०० कोटींचा निधी मंजूर करा

## खा. डॉ. अजित गोपछडे यांची सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील रस्ते विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा. या पावसाळी अधिवेशनात निधीला मंजुरी द्यावी अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणा सीमावर्ती भागातील देगलूर तालुक्यातील अनेक गावातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. अनेक मार्ग बिकट झाल्यामुळे या भागातील



नागरिकांना प्रचंड यातना सहन कराव्या लागत आहेत. देगलूर – करडखेड – मरखेल – हाणेगाव ते कर्नाटक राज्य सीमा प्रमुख जिल्हा मार्ग सात या रस्त्यावर लहान पूल, नळकांडी पुलाच्या बांधकामासह रस्त्याचा विकास करावा, अशी मागणी ही खा. डॉ. गोपछडे यांनी केली आहे. देगलूर तालुक्यातील रस्ते विकास झाल्यास या भागातील दळणवळणाची साधने वाढतील आणि ग्रामीण भागात विकासाची नवी पायाभरणी केली जाईल. कृषी क्षेत्राला संजीवनी मिळेल. शेतकऱ्यांच्या प्रगतीला मोठा फायदा होईल. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही आपण लवकरच भेट घेणार असल्याचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले आहे.

# प्रभारी कुलगुरूंची किनवटच्या महाविद्यालयांना भेट

**किनवट (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी शनिवारी दि. ५ रोजी विद्यापीठाच्या किनवट येथील कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, बळीराम पाटील महाविद्यालय व सरस्वती म हाविद्यालय येथे भेट दिली. विविध शैक्षणिक समस्यांवर संस्थाध्यक्ष, प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांच्याशी संवाद त्यांनी साधला.

आदिवासीबहुल क्षेत्रात नवनवीन संशोधन, गुणवत्ता वाढ याकडे विशेष लक्ष देत विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे, त्यासाठी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन डॉ. महाजन यांनी याप्रसंगी दिले.



बळीराम पाटील महाविद्यालय येथे प्राचार्य शिवराज बेंबरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी प्राध्यापकांशी संवाद साधला. सरस्वती महाविद्यालयात संस्थाध्यक्ष व्यंकटराव नेम्म नीवार, प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांच्या उपस्थितीत प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. प्रवेश प्रक्रियेतील अडचणी तासिका व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत येणाऱ्या अडीअडचणींवर यावेळी चर्चा करण्यात आली.

महाविद्यालयातील सोयी, सुविधांचीही त्यांनी पाहाणी केली. आदिवासी संशोधन केंद्रातील आवश्यक असलेल्या सुविधांबाबत चर्चा करून विद्यापीठ विविध सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रभारी समन्वयक मार्तंड कुलकर्णी, सहसमन्वयक सुनील व्यवहारे यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक यावेळी उपस्थित होते.

# म. युसुफ म. मौलाना यांना सेवानिवृत्तीनिमित्त निरोप



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा माहिती कार्यालयाचे वाहनचालक म. युसूफ म. मौलाना हे ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात बुधवारी त्यांच्या सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, उपसंपादक अलका पाटील, वरिष्ठ लिपिक काशिनाथ आरेवार, लिपिक टंकलेखक अनिल चव्हाण, शिपाई चंद्रकांत गोधने यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, श्रीमती अलका पाटील व काशिनाथ आरेवार यांनी मनोगत व्यक्त करुन म. युसुफ म. मौलाना यांना सेवानिवृतीबाबत व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी कर्मचाऱ्यांच्यावतीने त्यांना शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो यांनी घेतली कंबोडियाच्या पर्यटन मंत्र्यांची भेट

**मुदखेड (प्रतिनिधी)**– अखिल भारतीय भिखू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो यांच्यासह २६ उपासकांचे एक शिष्टमंडळ कंबोडीयाच्या पर्यटन दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात राजधानी फ्नॉम पेन्ह येथे पर्यटन मंत्री एच.ई. हाऊट हक यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. या भेटीत भारतातील बिहार येथील बुध्दगया महाविहार मुक्ततेबाबत, भारतातील बौध्द स्थळांच्या देखभाल आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

भारतातील बौध्द स्थळांच्या देखभालीबाबत पुरातन खाते उदासीन असल्याबाबत व बौध्दांना भारतात अनुसूचीत जातीच्या सवलती नाहीत. बुध्दांची जनगणना करत असताना स्वतंत्र कॉलम ठेवण्यात आलेला नाही. बौध्दांसाठी भारतात विवाहाचा व वारसा हक्काचा स्वतंत्र कायदा नसल्याबाबत लक्षात आणून दिले. भिक्खूंसाठी कंबोडीया देशाचा व्हीजा फ्री करावा, कंबोडीया येथून



बुध्द मुर्ती ग्रंथ, चिवर इतर बौध्द साहित्य नेताना कस्टम व इतर टॅक्सेस लावू नये. कुंभमेळ्यासाठी भारत सरकार खर्च करतो तसाच भारतीय बौध्दांच्या परिषदावर करीत नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी भन्ते शिलरत्न प्रा. प्रदिप रोडे उपस्थित होते. तसेच कंबोडीयाचे सांस्कृतिक व धार्मिक विभागाचे मंत्री एच. ई. चाय बोर्टन यांच्या सोबतसुध्दा त्यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीत भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो, भंन्ते शिलरत्न तसेच, प्रा. प्रदिप रोडे यांनीही सहभाग घेतला.

सांस्कृतीक व धार्मिक विभागाच्या मंत्र्यांनी सर्व विषय व प्रश्नाबाबत प्रधानमंत्र्यांच्या कॅबिनेट बैठकीत चर्चा करून भारत सरकारला विनंती करण्यात येईल, असेही आश्वासित केले. दोन्ही मंत्र्यांनी भदन्त यांचा स्मृतीचिन्ह– शाल देवून सन्मान केला.

# पाणी फाउंडेशनतर्फे डिजीटल शेतीशाळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्यावतीने डिजीटल शेतीशाळा राबविण्यात येणार आहे. या डिजीटल शेतीशाळांचे वेळापत्रक प्राप्त झाले असून शेतकऱ्यांना स्वत: झुम लिंकवर किंवा पाणी फाउंडेशनच्या युटयुब चॅनलवर लाइव्ह कार्यक्रमास जॉईन होता येणार आहे. शेतकऱ्यांनी या डिजीटल शेतीशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

या डिजीटल शेतीशाळेमध्ये दर सोमवारी सायंकाळी ६.१५ वा. बाजरी, सायंकाळी ७.३० वा. सोयाबीन, दर मंगळवारी सायंकाळी ६.१५ वा. खरीप ज्वारी तसेच सायं.७.३० वा. कापूस, दर बुधवारी सकाळी १० वा. भात, सायं. ६.१५ वा. मका तसेच सायं. ८ वा. पशुधन, दर गुरुवारी सायंकाळी ६.१५ वा. राजमा (घेवडा) तसेच सायंकाळी ७.३० वा. आंबा व पेरु, संत्रा, मोसंबी व कागदी लिंबु दर शुक्रवारी सायंकाळी ७.३० वा. तुर, मुग व उडिद, दर शनिवारी सायंकाळी ७.३० वा. भाजीपाला या पिकांचे शेतीशाळेमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

पाणी फाउंडेशन ही संस्था महाराष्ट्रामध्ये कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने डिजीटल शेतीशाळा राबवित असते. या डिजीटल शेतीशाळेचा शेतकऱ्यांना फायदा होत असल्याचे पाणी फाउंडेशनच्या विविध कार्यक्रमातून व शेतकऱ्यांच्या अनुभवातून दिसून येत आहे.

# भाजपा सिडको मंडळ कार्यकारिणीतील विविध आघाडीचे पदाधिकारी घोषित



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको भाजप मंडळाध्यक्ष सचिन रावका यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या संमतीने व महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको मंडळ कार्यकारिणी जाहीर केली आहे. यात दोन सरचिटणीस,सहा उपाध्यक्ष, सहा चिटणीस, कोषाध्यक्ष, सोशल मीडिया यांचा समावेश आहे.

या कार्यकारिणीत युवा म ोर्चा अध्यक्ष मोनु जोशी, महिला मोर्चा विजयाताई गोडघासे, एस. सी. मोर्चा विशाल गंडीबे, तर डॉक्टर आघाडी डॉ. संतोष महाजन यांच्यासह ओबीसी मोर्चा अध्यक्ष चंद्रकांत डहाळे, आदिवासी मोर्चा अध्यक्ष आकाश मोरे, अल्पसंख्याक आघाडी इम्रान खान पठाण व मंडळ १८ जणांचा समावेश केला आहे.

भाजपा मंडळ सरचिटणीस म्हणून बालाजी धुमाळ, चंद्रकांत बंडेवार, उपाध्यक्ष म्हणून भुजंग मोरे, प्रमोद रेवणवार,ज्ञानोबा गिरडे, संजय गिरी, विठ्ठल घाटे, प्रा.रमेश नांदेडकर तर चिटणीस म्हणून सुषमा शिंदे, प्रमोद काळेवाड, सुरेश काळे, सुनिता अर्धापूरकर, रोहित राठोड, शिवराज देशमुख, कोषाध्यक्ष म्हणून सुचिता कोतावार, सोशिएल मिडिया प्रमुख प्रितेश देवशेटवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर भाजपा मंडळ अंतर्गत असलेल्या युवा मोर्चा अध्यक्षपदी मोनु जोशी, महिला मोर्चा अध्यक्षपदी विजयाताई गोडघासे, एस.सी.मोर्चा अध्यक्ष विशाल गंडीबे, अल्पसंख्याक आघाडी इम्रान खान पठाण, एसटी आदिवासी मोर्चा अध्यक्ष आकाश मोरे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष चंद्रकांत डहाळे, डॉक्टर आघाडी डॉ.संतोष महाजन यांच्यी नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीझालेल्यापदाधिकारी व विविध आघाडीचा अध्यक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

# डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय परिसरात ५०० झाडांचे वृक्षारोपण

**नांदेड (प्रतिनिधी)** – डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरात 'हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र', 'एक पेड माँ के नाम २.०' या देशव्यापी अभियान राबविण्यात आले. अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते ५ जुलै रोजी ५०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरण हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पर्यावरण आपल्याला स्वच्छ हवा, शुध्द पाणी आणि सकस अन्न पुरवते. पर्यावरणाचे संरक्षण करणे, ही आपली सर्वाची नैतिक जबाबदारी असून, आपण सर्वानी एकत्र येवून पर्यावरणाचे संरक्षण केले तरच आपण एक चांगले भविष्य निर्माण करु शकतो असे मत अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी केले.



पर्यावरणामध्ये विविध नैसर्गिक संसाधने आहेत. त्यांचे जतन आवश्यक असून, जेणेकरुन भविष्यात त्यांची कमतरता भासणार नाही. पर्यावरणातील सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. त्यापैकी एका घटकावर परिणाम झाल्यास, त्याचा परिणाम इतर घटकांवरही होतो. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण केल्यास जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाची समस्या कमी करता येते. या वृक्षारोपणामुळे जैवविविधता जोपासण्यास हातभार लागून पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल व आपल्या भावी पिढीचे जगणे सुखकर होईल, असे मत अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांनी व्यक्त केले.

या वृक्षारोपण कार्यक्रमात वड, कडुलिंब, पिंपळ, आवळा, बांबू, जांब, हिरडा इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात हिंगोलीचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. हेमंत गोडबोले, वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजय कापसे, डॉ. एस. आर. मोरे, डॉ. राजेश अंबुलगेकर, डॉ. एम. ए. समीर, डॉ. शीतल राठोड, डॉ. किशोर राठोड, डॉ. वंदना दुधमल, डॉ. आय.एफ.इनामदार, डॉ. भावना भगत, डॉ. अनिल देगांवकर, डॉ. अतिष गुजराती तसेच विविध विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मुकुंद कुलकर्णी, डॉ. पंकज कदम, डॉ. सलिम तांबे, उप वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभिजीत देवगरे, प्रशासकीय अधिकारी के.बी.विश्वासराव, संजय वाकडे, नियोजन अधिकारी बालाजी डोळे, अधिसेविका अलका जाधव यांचेसह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. सहयोगी प्राध्यापक डॉ. आर.डी. गाडेकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी



पावसाळा उन्हापासून दिलासा तर देतोच, पण सोबत अनेक आजार आणि समस्या घेऊन येतो. या ऋतूत त्वचेची आणि केसांची काळजी घेणे खूप कठीण असते. या ऋतूमध्ये केसांची चमक तर कमी होतेच शिवाय ते आणखी गळायला व तुटायला लागतात. या ऋतूमध्ये केसांची विशेष काळजी घेताना आपण काही चुका करतो, ज्यामुळे फायदा होण्याऐवजी नुकसान होते. पावसाळ्यात कुरळ्या केसांची आणखी काळजी घ्यावी लागते. कारण आर्द्रतेमुळे त्यांना मॅनेज करणे अधिक कठीण होऊन बसते.

## पावसाळ्यात कुरळया केसांना करा मॅनेज!

कुरळ्या केसांचे क्यूटिकल्स घट्ट नसतात, त्यामुळे ते रफ होतात. ते ओलावा टिकवून ठेवू शकत नाहीत आणि म्हणून ते अधिक तुटतात. कुरळ्या केसांना हायड्रेटेड ठेवण्यासाठी आणि त्यांना दुरुस्त करण्यासाठी प्रथिनांची आवश्यकता असते. म्हणूनच या ऋतूत आपल्या आहाराकडे अधिक लक्ष द्या. कुरळे केस सहज कोरडे पडतात कारण त्यांचे क्यूटिकल घट्ट नसतात. पावसाळ्यात हे वारंवार घडते. कारण कुरळे केस मॅनेज व्हावे म्हणून तुम्ही ते वारंवार धुता. कुरळे केस निर्जलीकरणामुळे तुटतात, तसेच मुळाशी कमकुवत होतात. जाणून घेऊया या ऋतूत कुरळ्या केसांची काळजी कशी घ्यायची आणि काय करू नये.

### केस रोज धुवू नयेत

आपल्याला असे वाटते की आपण दररोज आपले केस धुतले तर ते छान फ्रेश व बाऊन्सी दिसतील. पण असे करू नये. यामुळे केसांची आर्द्रता कमी होऊन केस तुटू लागतात. त्यामुळे आठवड्यातून केवळ २ ते ३ वेळा केस धुवावेत. आपल्याला आपली टाळू स्वच्छ ठेवणे आवश्यक असते. पावसाळ्यात शॅम्पू बदलण्याची गरज नसते. पण टाळूला खाज सुटत असेल तर केटोकोनाझोल असलेला शॅम्पू वापरा म्हणजे कोंडा किंवा फंग इन्फेक्शनचा त्रास होणार नाही.

### वारंवार तेल लावणे

पावसाळ्यात केस कोरडे होतात आणि डल दिसतात. त्यामुळे आपण केसांना भरपूर तेल लावतो जेणे करून त्यांना पोषण मिळेल. पण ही चूक करू नका. यामुळे केसांमध्ये धूळ आणि घाण चिकटून बसते व त्यामुळे केस निर्जीव होऊन तुटतात. कोरड्या व रफ केसांना सारखे तेल लावण्याऐवजी जेल आधारित स्मुथनींग सीरम लावावे.

### ब्लीच करणे टाळा

पावसाळ्यात केसांची कोणतीही ट्रिटमेंट करू नये. विशेषतः कुरळ्या केसांशी तर मुळीच खेळ करू नये. यामुळे ते आणखी रफ आणि कोरडे होऊ शकतात. पावसाळ्यात अनेक लोक कंडिशनर लावायचा कंटाळा करतात. पण असे अजिबात करू नये. शॅम्पूने स्कॅल्प स्वच्छ केल्यानंतर केसांना कुरळेपणापासून दूर ठेवण्यासाठी कंडिशनर लावणे आवश्यक आहे.

### पावसापासून केसांचे करा रक्षण

घरातून बाहेर पडण्यापूर्वी केस भिजू नयेत म्हणून कॅप घाला किंवा छत्री घ्या. पावसाच्या पाण्यामुळे कुरळे केस आणखीनच रफ व कोरडे होतात. चुकून तुम्ही पावसात भिजलात तर घरी परतल्यावर टॉवेलने केस नुसते. सुकवण्याऐवजी लगेच शॅम्पू करा. याने केस आणि टाळू स्वच्छ होतील आणि त्याचबरोबर खाज येण्याची समस्याही कमी होईल. केस स्वच्छ ठेवल्याने ते निरोगी होतील आणि केस गळण्याची समस्याही कमी होईल. कुरळ्या केसांना अतिरिक्त पोषणाची आवश्यकता असू शकते, म्हणून, त्यांना मऊ ठेवण्यासाठी हायड्रेटिंग शॅम्पू आणि रिच कंडिशनर वापरावे. बऱ्याच मुली, ऑफिस किंवा कॉलेजमध्ये पोहोचण्याच्या घाईत शॅम्पू केल्यानंतर केसांचा अंबाडा बांधतात आणि नंतर ते सुकण्यासाठी उघडतात. पण, असे केल्याने केसांना वास येऊ लागतो आणि ते नीट सुकत नाहीत. म्हणूनच केस पूर्णपणे कोरडे केल्यानंतरच घराबाहेर पडा. अशा प्रकारे तुम्ही पावसाळ्यात कुरळ्या केसांची निगा राखू शकता.



## ...तर पापण्यांवर दुष्परिणाम!

टपोरे आणि बोलके डोळे तुमच्या सौंदर्यात अधिक भर घालतात. म्हणूनच मेकअपमध्येही डोळ्यांचा मेकअप महत्त्वपूर्ण समजला जातो. आय मेकअप करताना काजळ, आय लायनर, मस्कारा, कृत्रिम आयलॅशेस, आय शॅडो, आय शॅडो प्रायमर, शिमर अशा अनेक गोष्टी वापरण्यात येतात. या सर्व गोष्टी करताना डोळ्यांचा आणि पापण्यांचा मेकअपमधील केमिकल्ससोबत संपर्क येतो. जर मेकअप काढताना तो सावधपणे काढला नाही तर त्याचा थेट दुष्परिणाम तुमच्या पापण्यांच्या आरोग्यावर होतो. यासाठी काही गोष्टी करताना सावध राहायला हवं. या काही चुका तुमच्या डोळ्यांचे आरोग्य बिघडवू शकतात.



- डोळे चोळू नका : डोळे चोळणे ही अनेक लोकांकडून नकळत घडणारी अशी एक चूक आहे. ज्यामुळे डोळ्यांचे आणि पापण्यांचे खूप नुकसान होते. कारण डोळे जोरात चोळण्यामुळे पापण्यांचे केस तुटतात. डोळ्यात काही गेलं अथवा डोळ्यांची जळजळ होत असेल तर डोळे चोळण्यापूर्वी जरा सावध राहा. असं झालं तर डोळे चोळण्याऐवजी डोळ्यांवर पाणी शिंपडा. ज्यामुळे डोळ्यात गेलेलं बाहेर पडेल आणि डोळे न चोळता तुम्हाला बरं वाटेल.
- रात्री मेकअप न काढता झोपणे : मेकअपची आवड सर्वांनाच असते, पण मेकअप काढण्याचा मात्र अनेक जणी कंटाळा करतात. काही जणी तर मेकअप न काढताच झोपी जातात. असं केल्याने तुमच्या पापण्यांचे अतोनात नुकसान होते. बराच काळ मेकअप डोळ्यांवर असल्यामुळे पापण्यांचे केस कमजोर होतात आणि गळू लागतात. म्हणूनच कधीच मेकअप काढल्याशिवाय झोपू नका.
- चुकीच्या पद्धतीने मेकअप काढणे : डोळ्यांचा मेकअप चुकीच्या पद्धतीने काढण्यामुळेही बऱ्याचदा पापण्यांचे नुकसान होऊ शकते. कारण काही जणींनां जोरात चोळून आय मेकअप काढण्याची सवय असते. असं केल्यामुळे डोळ्यांची नाजूक त्वचा रगडली जाते आणि पापण्यांचे केस गळून जातात. म्हणूनच नेहमी चांगल्या गुणवत्तेच्या मेकअप रिमूव्हरने हळूवारपणे मेकअप काढावा. वॉटर प्रूफ मस्कारा काढण्यासाठी कॉटन पॅडवर मेकअप रिमूव्हर घ्या आणि एक मिनीट ते डोळ्यांवर तसंच ठेवा. ज्यामुळे सहज तुमचा आय मेकअप रिमूव्ह होईल.

### एक्सपायर झालेला आय मेकअप

डोळ्यांचा मेकअप दररोज केला जात नाही. काजळ आयलायनर नियमित वापरलं जातं. मात्र मस्कारा, आय शॅडो, आय लॅंशेस अशा गोष्टी क्वचित वापरल्या जातात. ज्यामुळे बऱ्याच दिवस मेकअपचं साहित्य घरात पडून असतं. आय मेकअप एक ते दोन वर्षांपेक्षा जास्त काळ वापरू नये कारण त्यांचे शेल्फ लाईफ जास्त नसतं. असे एक्सपायर झालेले आय मेकअप प्रॉडक्ट वापरण्यामुळे तुमच्या पापण्यांचे नुकसान होऊ शकतं.

## पाटल्या, बाजूबंद, तोडे, फॅशन जोडे



'मराठी पद्धतीचे दागिने...ईss सो ओल्ड फॅशन' असं आता बिलकूल म्हणता येणार नाही. तोडे, पाटल्या, बिल्वर, बाजूबंद, ठुशी अशा खास मराठमोळ्या दागिन्यांची फॅशनच सध्या 'इन' आहे. पारंपरिक कपड्यांवरच नव्हे तर पाश्चिमात्य पेहरावावरही हे दागिने खुलून दिसतायत...

पायघोळ स्कर्ट, त्यावर टीबॅग आणि गळ्यात चक्क पुतळ्यांची माळ, पण जरा वेगळ्या पद्धतीने गुंफलेली... लग्नसमारंभात वेस्टर्नाइज्ड कड्यांना मागे टाकत पिछोड्यांनी आणि पाटल्यांनी मारलेली बाजी हे आजकाल सर्रास पाहायला मिळतंय. कारण मराठी दागिने आता फॅशनविश्वात प्रसिद्ध झाले आहेत. बॉलिवूड, टीव्हीमधल्या कलाकृतींमध्ये मराठी कुटुंबांनी स्थान मिळवलं. साहजिकच मराठमोळे कपडे आणि दागिने याविषयीही फॅशनविश्वाला उत्सुकता वाटू लागली आहे. त्याचंच प्रतिबिंब सिनेमातून दिसतं आहे. तरुणाईलाही या दागिन्यांनी भुरळ घातली आहे.

### तरुणाईही प्रेमात

तरुणाईनेही हे मराठमोळे दागिने उचलून धरले आहे. त्यामुळे विविध कॉलेजमध्ये तरुणी मुद्दामहून असे दागिने मिरवताना दिसतात. कानात भिकबाळी घालणं हे फॅशन स्टेटमेंट तर मुलांनी केव्हाच पॉप्युलर केलं आहे. पुतळ्यांची माळ, ठुशी, मोहनमाळ, लक्ष्मीहार, चमकी, मोत्यांच्या कुड्या, कोल्हापुरी साज हे दागिने मुली अनेक प्रसंगी आवर्जून वापरताना दिसतात.



### सण वारांच्या निमित्तानं...

- दागिने आपल्या मराठमोळ्याच नव्हे तर पाश्चिमात्य पेहरावावरही घालता येतील. सणवारालाही यातली काही कॉम्बिनेशन्स तुम्हाला ट्राय करता येतील.
- जीन्स-टॉपवर एकच दागिना घालायचा असेल तर गळ्यात पुतळ्यांची माळ घालू शकता किंवा नाकात चमकीही घालू शकता. एखाद्या स्लिवलेस ड्रेसवर मराठमोळा बाजूबंद खुलून दिसेल.
- गळाबंद पंजाबी ड्रेसवर किंवा टॉपवर कानात फक्त मोत्याच्या कुड्या ट्राय करू शकता. केसात खोवायचं सोन्याचं फूलही एखाद्या हेअरस्टाइलमध्ये वापरू शकता किंवा प्लेन ड्रेसवर ब्रोच म्हणूनही वापरता येईल.

## वाईट सवयींमुळे ओठ होतात काळे

**बरेचदा ओठ काळे पडण्यामागे नैसर्गिक कारणे असतात. याशिवाय आपल्या काही चुका आणि आपल्याला असणाऱ्या चुकीच्या सवयींमुळेही ओठ काळे पडतात. बरेचदा आपण ज्या चुका करतो त्याकडे आपले लक्ष जात नाही. त्या चुका अनाहूतपणे घडत असतात पण त्याचा परिणाम ओठ काळे पडण्यावर नक्कीच होत असतो. अशा या कोणत्या चुका आहेत, ज्या आपल्या ओठांना काळे पाडतात, त्याबाबत आपण जाणून घेऊ आणि तुम्हीही या चुका करत असाल तर वेळीच सावध व्हा आणि आपल्या ओठांची काळजी घेण्याची सुरुवात करा. काळे ओठ गुलाबी करण्यासाठी अनेक घरगुती उपायदेखील आहेत.**

- लोकल लिपस्टिकचा वापर : ओठांचे सौंदर्य वाढविण्यासाठी लिपस्टिक एक अत्यंत महत्त्वाची भूमिका साकारत असते. पण अनेकदा असे दिसून आले आहे की, काही पैसे वाचविण्याच्या नादामध्ये अनेक महिला या अगदी ट्रेनमध्ये अथवा फुटपाथवर असणाऱ्या लोकल लिपस्टिक विकत घेतात आणि ओठांवर त्याचा उपयोग करतात. या लिपस्टिकमुळे ओठ अधिक काळे पडतात. कारण या लिपस्टिकमध्ये वापर करण्यात आलेल्या घटकांचा दर्जा तितका चांगला नसतो. त्यामुळे नेहमी ब्रँडेड लिपस्टिकचा वापर करावा. तुम्हाला अधिक पैसे खर्च नसतील करायचे तर तुम्ही घरातील नैसर्गिक गोष्टींचा वापर करून लिप टिंट तयार करा आणि ते तुमच्या ओठांवर लावा.



- तारीख संपलेल्या लिपस्टिकचा वापर : काही महिला जेव्हा लिपस्टिक खरेदी करतात तेव्हा वर्षानुवर्षे त्याच एका लिपस्टिकचा वापर करतात. पण तुम्हाला माहीत आहे का? अशा लिपस्टिक वापरून तुमचे ओठ पटकन काळे पडू शकतात. तुम्हाला तुमच्या ओठांची काळजी घ्यायची असेल तर तुम्ही लक्षात ठेवा की, एक्सपायर्ड अर्थात तारीख संपलेली लिपस्टिक कधीही ओठांवर लावणे चुकीचे ठरते. यामुळे ओठांना अधिक त्रास होतो. तसंच कधीही ओठांवर अथवा लिपस्टिकवर घाणेरड्या ब्रशचा वापरही करू नका.
- लिपस्टिक न काढता वावरणे : तुम्ही दिवसभर लिपस्टिक लावली असून रात्रीही ती काढली नाही तर तुमचे ओठ अधिकाधिक लवकर काळे पडणं सुरु होते. त्यामुळे तुम्ही दिवसभर चेहऱ्यावर कितीही मेकअप केला असेल अथवा ओठांना कितीहीवेळा लिपस्टिक लावली असेल तरीही ती योग्य पद्धतीने काढून टाकायला हवी. लिपस्टिक काढल्यावर त्यावर कच्चे दूध वा दुधाची साय आणि गुलाबपाणी मिक्स करून आपल्या ओठांवर लावा. यामुळे तुमच्या ओठांचा गुलाबीपणा टिकून राहण्यास मदत मिळते. तसंच तुमच्या ओठांचा काळेपणा दूर करण्यासाठी आठवड्यातून एक वेळा तुम्ही लिप स्क्रब करणेही गरजेचे आहे. या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवा आणि तुमचे नैसर्गिक गुलाबी ओठ टिकविण्याचा तुम्ही प्रयत्न करा. या सवयींपासून दूर राहण्याचा नक्की प्रयत्न करा.

## अति तिथं माती... जास्त प्रमाणात कंडिशनरचा वापर केल्याने केसांचे नुकसानच

**प्रत्येकाला आपले केस रेशमी, चमकदार आणि निरोगी ठेवण्याची इच्छा असते. म्हणूनच बहुतेक लोक केसांना कंडिशनर लावतात. परंतु केसांसाठी जास्त कंडिशनर वापरणे देखील धोक्याचे असू शकते.जास्त कंडिशनर वापरल्याने तुमचे केस जास्त स्निग्ध किंवा तेलकट होण्याचा धोका असतो. जास्त प्रमाणात कंडिशनरचा वापर केल्याने केस सुंदर आणि मुलायम होण्याऐवजी कोरडे आणि कमकुवत होऊ शकतात. म्हणूनच कंडिशनरचा वापर संतुलित करणे अत्यंत आवश्यक आहे. चला तर मग जाणून घेऊया कंडिशनर किती वेळा वापरावे...**

### कंडिशनर कसे काम करते?

कंडिशनर हे केसांसाठीचे मॉइश्चरायझर आहे. हे कोरड्या आणि ठिसूळ केसांवर एक गुळगुळीत थर तयार करते. त्यामुळे केसांचा गुंता होत नाही आणि नंतर ते विंचरणे सोपे जाते. तसेच कंडिशनर हे केसांवर एक संरक्षक थराप्रमाणे काम करते. हे सहसा cationic surfactants चे बनलेले असते. हे तुमचे केस गुळगुळीत करण्यास मदत करते. या व्यतिरिक्त कंडिशनरमध्ये इमोलिएंट्स, तेल आणि कधीकधी सिलिकॉन देखील वापरले जातात. सिलिकॉन हे केस चमकदार बनवण्यासाठी आणि गुंता कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. कंडिशनर केसांना मॉइश्चरायझ करण्यासोबतच ते चमकदार आणि मऊ आणि सरळ बनवण्याचे काम करते. हेअर ड्रायर आणि कर्लिंग आयरनमुळे होणारे नुकसानही टाळते व केसांचा ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते.



### ओव्हर कंडिशनिंग करणे टाळा

कंडिशनरचा वापर संतुलित पद्धतीने केल्यास केसांना अनेक प्रकारे फायदा होऊ शकतो. पण जर तुम्ही तुमचे केस ओव्हर कंडिशनिंग करत असाल तर काळजी घ्या. यामुळे तुमच्या केसांना अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. केस लवकर व अधिक तेलकट होणे, केस बाऊन्सी होण्याऐवजी स्कॅल्पला चिकटून बसणे, जास्त चमक किंवा चकचकीतपणा, केस विंचरताना त्रास होणे ही कोणतीही लक्षणे तुमच्या केसांमध्ये दिसत असतील तर कंडिशनरचा वापर कमी करावा. जर तुम्ही केसांमध्ये कंडिशनरचा वापर संतुलित पद्धतीने केला तर तुम्हाला तुमचे केस चमकदार आणि निरोगी ठेवण्यास कोणतीही अडचण येणार नाही. ओव्हरकंडिशनप्रमाणेच अंडरकंडिशन देखील केसांसाठी एक समस्या आहे. त्याची काही लक्षणे म्हणजे केसांचा गुंता होणे, कोरड्या किंवा ठिसूळ वायरप्रमाणे केस सहजपणे तुटणे, केस कुरळे होणे, केस निस्तेज होणे इत्यादी. जर तुम्हाला तुमच्या केसांमध्ये यापैकी कोणतीही लक्षणे दिसली तर काळजी करू नका. फक्त केसांना चांगले कंडिशन करा, जास्त वेळा केसांना कंडिशनर लावण्याचा प्रयत्न करा. केसांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी वेळोवेळी डीप कंडिशनिंग करा.

# विकासकामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचे विचाराधीन -मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)**राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निर्णयानुसार १० लाख किमतीपर्यंतच्या विकासाच्या कामांचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना करण्यात येते. महिला सहकारी संस्थांची नोंदणी करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यापुढे अशा कामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचाही शासनाचा विचार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

माजलगाव (जि. बीड) येथील पाटबंधारे विभागातील कामांच्या वाटपाबाबत सदस्य प्रकाश सोळंके यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चे दरम्यान सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकासाची कामे वाटप करण्याबाबत अधिक पारदर्शकपणा आणण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येईल. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार कामांच्या वाटपात सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यात येईल. लक्षेवधी सूचनेच्या उत्तरात जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे - पाटील म्हणाले, माजल-गाव पाटबंधारे विभागाकडे ६ मध्यम, ५३ लघु आणि ७ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे असे एकूण ६६ प्रकल्प आहेत. या माध्यमातून ८७ हजार ९९३ सिंचन क्षेत्राच्या व्यवस्थापनाचे काम या विभागामार्फत सांभाळले जाते. या विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी १० लक्षपेक्षा कमी किमतीच्या अत्यावश्यक एकूण १४८ कामांची प्रापनसूची मंजूर करण्यात आली. कामांच्या वाटपाचा चौकशी अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील. अहवालानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल, असेही पाटील यांनी सांगितले.

# फ्री फायरच्या नादात शेतकऱ्याच्या मुलाने उडविले ५ लाख

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** -जिल्ह्यात शेतकऱ्याने म्हशी घेण्यासाठी सात लाख रुपये साठवले होते. पण मुलाने ऑनलाईन गेमच्या नादात पाच लाख रुपये गमावल्याची घटना राधानगरी तालुक्यात घडली आहे .

आजकाल लहान मुलांमध्ये मोबाइल वर गेम खेळण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. पालक देखील याकडे दुर्लक्ष करत असतात. याउलट मुले त्रास देऊ लागले की, पालक मुलांना मोबाइल देऊन शांत करतात. परंतु हे दुर्लक्ष करणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय कोल्हापूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला आला आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या राधानगरी तालुक्यातील एका शेतकऱ्याने म्हशी घेण्यासाठी ७ लाख रुपये बँक खात्यात साठवले होते. संबंधित शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून पैसे गोळा करत होता. म्हशी घेण्यासाठी हे पैसे तो साठवत होता. आपल्या बँक खात्यात किती पैसे गोळा झाले याची माहिती घेण्यासाठी बँकेत गेला असता, बँकेतील स्टेटमेंट तपासल्यानंतर त्याला धक्काच बसला. खात्यावर केवळ दोन लाख रुपये उरले असल्याच बँक स्टेटमेंटमध्ये दिसत होते. बँकेकडे अधिक चौकशी केली असता बँकेने पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. शेतकऱ्याने त्वरित सायबर पोलिसांकडे धाव घेतली. सायबर पोलिसांनी देखील वेगाने तपास करत बँक खात्यातील ट्रांजेक्शन तपासले. तसेच शेतकऱ्याचा मोबाईल देखील तपासला. यावेळी काही रक्कम फ्री फायर गेममध्ये ॲप घेण्यासाठी यूपीआय पद्धतीने ट्रांजेक्शन केल्याच समोर आले आहे.

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, बेबेताई साईनाथ वाघमारे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.--गट.नं.-४२ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर -१७७ मालमत्ता नं.-२६६ नविन वार्ड नं.-२ नविन मालमत्ता नं.-२०६४/२ साईज पुर्व पश्चिम - ४० फुट. दक्षिण उत्तर-३० फुट., चुर्तसिमा पुर्वे -२० फुट रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर १८०, दक्षिण : प्लॉट नंबर १७६, उत्तर :प्लॉट नंबर १७८ सोबिया मुस्कान महेबुब खान यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, रामचंद्र विठ्ठलराव मुसळे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-४०२ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-ई-४७६ नविन वार्ड नं.-१० नविन मालमत्ता नं.-१०७० साईज पुर्व पश्चिम ३० फुट..- दक्षिण उत्तर-६० फुट.

चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ७, पश्चिम: प्लॉटनंबर ९, दक्षिण : भोकर नांदेड रोड, उत्तर :प्लॉट नंबर ३३ बसवेश्वर नारायणराव दंडवे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे.

तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, पदमावती वैजनाथ गव्हाणे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-५७८ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -३ मालमत्ता नं.-ई-४६३/१७ नविन वार्ड नं.-७ नविन मालमत्ता नं.-१३७६ साईज पुर्व पश्चिम - ३० फुट. दक्षिण उत्तर-४० फुट., चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर २, पश्चिम: ६.१० मीटर रस्ता, दक्षिण : ६.१० मीटर रस्ता, उत्तर :प्लॉट नंबर १२ माधव भूजंगराव कदम मंजूर आली यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, निकीता किशन भूसेवाड यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-६०७ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-१०८,१०९ नविन वार्ड नं.-९ नविन मालमत्ता नं.-११०,११०/१ साईज पुर्व पश्चिम - ३२ फुट. दक्षिण उत्तर-३० फुट.,

चुर्तसिमा पुर्वे -म.इब्राहिम म.करीम, पश्चिम: अमिर बेग हसम बेग, दक्षिण : रस्ता, उत्तर :रस्ता म.असरफ म.भाई यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
## जाहीर प्रगटन
(नाव परिवर्तन करणे बाबत)

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, भाग्यश्री रंगराव पवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-५७८ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -१३ मालमत्ता नं.-६-४६३/२७ नविन वार्ड नं.-१ नविन मालमत्ता नं.-१३८६/१ साईज पुर्व पश्चिम -९.१४ मीटरा. दक्षिण उत्तर-१२.१९ मीटर, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १४, पश्चिम: डॉ. प्लॉट नंबर १२, दक्षिण : प्लॉट नंबर २, उत्तर :६.१० मीटर रस्ता माधव भूजंगराव कदम यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदीखता अधारे/ वारसा अधारे नाव परिवर्तन करणयत यावे अशी अविनंती सादर केली आहे. तरी त्यांचे कर आकारणी नोंद वाहीत घेण्यात येत आहे.कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## न्यायाधिकरण, कृषी उत्पन्न बाजार समिती नायगाव जि. नांदेड तथा, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. हदगाव, जि. नांदेड यांचे कार्यालय
**कमलाई अपार्टमेंट, तामसा रोड, हदगाव, जि. नांदेड.**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व वियिमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५७ (३) अंतर्गत नोटीस डाक नोंद परत पावतीने

जा.क्र. कक्ष-१/पणन/इंडियामेग्रा अँग्रोकंपनी/१५६/२०२५. दिनांक :- ९/७/२०२५

प्रति,

१) श्री. अजयकुमार चंद्रप्रकाश बाहेती,
संचालक. इंडिया मेगा ग्रो अनाज कंपनी लि.
ऊ- ३, कृष्णूर, एम. आय. डी. सी., कृष्णर
ता. नायगाव (खै.), जि. नांदेड.

२) सर्व बाधीत शेतकरी

विषय : इंडिया मेगा ग्रो अनाज लि. एम. आय. डी. सी. कृष्णूर या कंपनीकडून शेतकऱ्यांचे शेतमालाचे पैसे वसूल करणेबाबत.

संदर्भ :

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचे कार्यालयीन आदेश जा. क्र. ५९१७ कक्ष- ४ / पणन / इंडियामेगा कृष्णूर/न्यायाधिकरण/२३ दि. २१/०९/२०२३.

२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५७ व नियम, १९६७ मधील तरतूद.

३) आपले पत्र दि. १०/०८/२०२३.

४) या न्यायाधिकरणाची नोटीस दि ७ /६/२०२४, ०७/८/२०२४ व १२/१२/२०२४

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. १ आदेशानुसार माझी इंडिया मेगा ग्रो अनाज लि. एम. आय. डी. सी. कृष्णूर या कंपनीकडून शेतकऱ्यांचे शेतमालाचे पैसे वसूल करण्यासंदर्भात न्यायाधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. इंडिया मेगा ग्रो अनाज लि. या कंपनीने सन २०२१ ते २०२३ या कालावधीत एकूण १०१५ शेतकऱ्यांकडून त्यांचा शेतमाल खरेदी करून त्यांचे शेतमालाचे पैसे त्यांना परत दिले नसल्याच्या तक्रारीच्या अनुशंगाने चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत. संदर्भ क्र. १ अन्वये न्यायाधिकरण म्हणुण माझी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या संदर्भात सदर कंपनीने शेतकऱ्याकडुन खरेदी केलेल्या शेतमालाची एकूण देणे रक्कम, त्या अनुषगांने होणारी बाजार फी व सुपरव्हीजन फी यांची रक्कम कंपनी कडुन येणे आहे. संदर्भ क्र.४ अन्वये कंपनीचा वर नमुद नोंदणीकृत पत्ता तसेच कार्यालयीन पत्ता संचालक, इंडिया मेगा ग्रो अनाज कंपनी लि. D- ९, विष्णु कॉम्प्लेक्स व्हिआयपी रोड, आयटीआय समोर, नांदेड - ४३१६०२ या पत्त्यावर आपणास सुनावणी नोटीस डाक नोंद परत पावतीने बजावली असता कंपनी बंद आहे व पत्तयावर नाही अनुक्रमे शेरा नमुद करून नोटीस परत आली आहेत.

त्या अर्थि या नोटीसी व्दारे आपणास अंतीमत: कळविन्यात येते की, सदर कंपनी कडुन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची येणे रक्कम रू१६,८२,७१,९८१/-, बाजार फी रू १७,१२,७६७/- व सुपरव्हीजन फी रू८५,६८८/- अशी एकूण रक्कम रू.१७,००,७०,३८६/- ची वसुली महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व वियिमन) अधिनियम १९६३ चे कलम ५७ मधील तरतुदी नुसार का करण्यात येवू नये या बाबतचे आपले लेखी म्हणणे माझे समक्ष सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता.हदगाव जि.नांदेड यांचे कार्यालयात कमलाई अपार्टमेट तामसा रोड हदगाव जि.नांदेड येथे दिनांक १६/७/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता उपस्थित राहून सादर करावे.सदर तारखेस लेखी म्हणणे सादर न केल्यास अथवा लेखी म्हणणे समर्थनिय नसल्यास आपल्या कंपनीकडून वरील रक्कमांची वसूली नमुद अधिनियमातील तरतुदीनुसार करणे बाबत योग्य तो निर्णय देईल बाधित शेतकऱ्यांनी आपले म्हणणे सहपत्रासह मांडावे सदर नोटीस आज दिनांक ९/७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी जारी करीत आहे.

**(एस.जी.गन्लेवार)**
**न्यायधिकरण**
**कृषी उत्पन्न बाजार समिती नायगाव जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

श्री व्ही. आय. घोरपडे दिवाणी न्यायाधीश,दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, बिलोली यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १११ /२०२५

अर्जदार-१. बोम्मोड गोविंद पि.धर्माजी, वय -३४ वर्ष, व्यवसाय - शेती, लोहारगल्ली, बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड. २.इराबाई भ्र.विठ्ठल फिरंगे वय ५० वर्षे व्यवसाय घरकाम रा.आलूर ता.धर्माबाद जि.नांदेड ३.रेखा भ्र.साईनाथ बारूळे वय ३०वर्षे व्यवसाय घरकाम रा.शेळगाव थडी ता.धर्माबाद जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार:-निरंक

प्रकरण - मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी, अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे की, मयत नामे धर्माजी नागन्ना बोम्मोड व गिरजाबाई धर्माजी बोम्मोड दोघ रा. बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड येथील रहिवाशी होत्या. धर्माजी नागन्ना बोम्मोड यांचा मृत्यू ११/१/२००८ व गिरजाबाई धर्माजी बोम्मोड यांचा मृत्यू दिनांक २१/५/२००८ रोजी मौजे बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड येथे मयत झाला.

मयत धर्माजी नागन्ना बोम्मोड व गिरजाबाई धर्माजी बोम्मोड, रा. बिलोली ता. बिलोली, जि. नांदेड यांचे वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र अर्जदारास मिळणेबाबत सदरील अर्ज अर्जदारांनी दाखल केला आहे. त्यानूसार सदरहू जाहिर प्रगटन देण्यात येत आहे की, ज्या कोणास या बाबत हरकती वा आक्षेप असल्यास त्यांनी आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायालयास दि. ४/८/२०२५ रोजी पर्यंत सादर कराव्यात. तारखेनंतर आलेल्या हरकती अथवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्जदाराचा अर्ज साबीत दिसल्यास वारसाचे प्रमाणपत्र दिले जाईल. करिता हे जाहिर प्रगटण.

आज दिनांक : ४ जूलै, २०२५ रोजी सही व शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन,**

**लिपीक** **सहा. अधिक्षक,**
**दुसरे दिवाणी न्यायालय. क. स्तर, बिलोली**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १००/२०२५ प्रकाश खंदारे व इतर विरुध्द निरंक

१.प्रकाश पि.नागोराव खंदारे, वय-५० वर्षे,रा.आरळी ता.बिलोली जि.नांदेड २.हणमाबाई भ्र.शंकरराव कुबरे वय ५० वर्षे रा.निझामाबाद ता.जि. निझामाबा ३.वनमालाबाई भ्र.मलिकार्जून सावळे वय ४७ वर्षे रा.खरबळ ता.मुधोळ जि.निर्मल

विरूध्द

गैरअर्जदार- निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत संतोष पि.नागोराव खंदारे यांचे अर्जदार क्र. १ हा मुलागा आहे.अर्जदार २ व ३ ह्या मुली आहेत. अर्जदाराची आई सुद्धा मयत झाली आहे.मयत मौजे आरळी ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी होते.मयत संतोष पि.नागोराव खंदारे यांचा मृत्यू दिनांक २५/७/२००७ रोजी झाला. मयताच्या पश्चात अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत संतोष पि.नागोराव खंदारे यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १/०८/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. ७ जुलै, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**.आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

मी ॲडवोके ट आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान,रा.निजाम कॉलनी ता.जि.नाांदेड सर्व जनतेस व संबांधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळवितो की,माझे वडील अल्ताफ इलाही खान पि.अहमद खान गट क्र.१९३ तुप्पा नाांदेड क्षेत्रफळ १० हेक्टर ९१ आर या जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत अधारे मालक व काबीजदार आहे. माझ्या वडीलांचे सदर जमिनी बाबत वकील म्हणून मी विविध न्यायालयात विविध अर्ज व याचिका व अपील व जाहीर प्रगटन सन २०१९ पासून दाखल करत आहे व वाद युक्तीवाद व इतर सर्व न्यायालयीन काम पाहत आहे. सदर जमिनी बाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरांगाबाद यांचे SA/४७/२०१८ मध्ये जैसे थे आदेश माझ्या वडीलांचे हक्कात आहे. तसेच सदर जमिनीचा फेरफार क्र. ७५०९ जो माझ्या वडीलाांचे नावे होता तो बेकायदेशीर रित्या रद्द करून त्या जागी बेकायदेशीर फेरफार क्र. ८०८३ एका मरण पावलेल्या व्यक्तीचा नाव टाकून केल्यामुळे फेरफार क्र. ८०८३ मध्येनमदू ०९ व्यक्तीविरुद्ध नाांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे दि.३०/०३/२०२४ रोजी गुन्हा क्र.०२६१ नुसार भा.द.पव ४२० व इतर २२ कलमाांप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्या गुन्हा क्र.०२६१/२०२४ मध्ये पुरावा नाही म्हणून जे A समरी रिपोर्ट पोलीस उपनिरिक्षक यांनी दाखल केले होते ते मा.मुख्य न्याय दांडाधिकारी साहेब याांच्या न्यायालयाने दि.३१/०५/२०२५ रोजी फेटाळलेले आहे व ९० दिवसात आरोपी विरूद्ध दोषारापत्र दाखल करण्यासाठी आदेश के लेले आहे. मला असे माहीत झालेले आहे कि आरोपी व भाऊ बंधू व इतर भामटे व षडयांत्र रचणारे माझ्या बाबत सदर जमिनीच्या संदर्भात काहीही अफवा व खोटी माहिती पसरवत आहे कि सदर जमिनीचे मी सौदा चिठ्ठी वगैरह केलेले आहे अशी खोटी माहिती परसवूल आरोपी व भाऊ बंधू व इतर भामटे माझ्या विरूद्ध षंडयंत्र रचत आहे सदर जमिनीबाबत मी कोणाशीही कोणत्याही प्रकारचा सौदा वगैरह केलेला नाही तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मी माझ्या वडीलांचा पुत्र म्हणून व त्यांचा वकील म्हणून उचित निर्णय घेण्याच्या अधिकार ठेवतो व मी व माझ्या वडीलांना जमिन गट क्र.१९३ तुप्पा नांदेड क्षेत्रफळ १० हेक्टर ९१ आर बाबत कोणाशीही कोणतेही सौदा चिठ्ठी खरेदीखत व इतर कोणतेही व्यवहार कलेले नाही तसेच सदर जमिनीच्या बेकायदेशीर फेरफर क्र. ८०८३/७/१२ मध्ये नमूद ९ आरोपींबाबत व भाऊ व बंधू व इतर भामटे सोबत कोणतेही सौदा चिठ्ठी व इतर कोणतेही व्यवहार करू नये केल्यास तो स्वत जबाबदार राहील व ते फौजदारी प्रक्रिय व दिवाणी न्यायालयाचे प्रक्रिये प्रमाणे उचित कार्यवाहीसाठी पात्र ठरतील व जाबाबदार राहील.

सबब हे जाहीर प्रगटन दिनांक ९/९/२०२५

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड. आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान.**
**मो.९१३०४४९४००.**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## सुवर्णसंधी

नांदेड जिल्ह्यात प्रथमच आपण आपल्या घरातुन, दुकानातुन पार्ट / फुल टाईम साखर(शुगर) चा व्यवसाय करा व दरमहिन्याला १ चांगले इनकम (न फा) मिळवा

**संपर्क**
**रिलायबल ट्रेडर्स गुरूवार बाजार सिडको नांदेड**
**मो.८०८७३१२३४४**
**(दर महिन्याला तुम्ही २० ते ४० हजार पर्यंत मिळवू शकता)**

## त्वरीत विकणे आहे

आमचे गजानन महाराज मंदीर जवळ तसेच नांदेड लातूर मेन रोडला लागून मुसलमानवाडी जवळ १३ शॉपचे बांधकाम झालेले कॉम्पलेक्स ३ साईड रोड असलेले साईज २०० बाय १०० किंवा १०० बाय १०० सहा दुकानासहित योग्य दरात त्वरीत विकणे आहे.

**संपर्क नंबर**
**८२७५५१०००६/९७६५४४३३११**


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १४६/२०२५ मौलनबी खंदारे व इतर विरुध्द निरंक

१.मौलनबीउमरसाब पिंजारी, वय-४५ वर्षे,२.अहेमद उमरसाब पिंजारी वय २९ वर्षे ३.छोटूमिया उमरसाब पिंजारी वय २५ वर्षे ४.मोहमद उमरसाब पिंजारी वय २३ वर्षे सर्व रा.कारला बु ता.बिलोली जि.नांदेड

विरूध्द

गैरअर्जदार- निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत उमरसाब शादुलसाब पिंजारी यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे.अर्जदार २ ते ४ हे मुले आहेत. अर्जदाराची आई सुद्धा मयत झाली आहे.मयत मौजे कारला बु.ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी होते.मयत उमरसाब शादुलसाब पिंजारी यांचा मृत्यू दिनांक १८/८/२०२३ रोजी झाला. मयताच्या पश्चात अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत उमरसाब शादुलसाब पिंजारी यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १८/०८/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. ४ जुलै, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**.आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

मौजे मारजवाडी ता. मुखेड जि. नांदेड येथील सर्वे नं. १०/ब, ११/ब आणि ११/ब २ याचे शेतकरी सानुग्रह अनुदान वाटप मा. उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय देगलूर येथे शेषाबाई काशीनाथ पंचडे, माहादप्पा शिवबसआप्पा पंचडे, गोदाबाई शिवबसआप्पा पंचडे, श्रीदेवी माहादप्पा पंचडे आणि संगमनाथ माहादप्पा पंचडे या व्यक्तिंना शेतकरी सानुग्रह अनुदान मिळणार आहे.

वरील ७/१२ मधिल प्रयागबाई भ्र. संग्राम रा. कोकलगाव ता. देगलूर जि. नांदेड यांचा इतर अधिकारात नाव असून त्यांचा या सानुग्रह अनुदानाशी काहीही संबंध नाही. जर कोणाचे आक्षेप असेल तर त्यांनी सबळ पुराव्यासह मा. उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय देगलूर यांच्या कार्यालयात ७ दिवसांच्या आत आक्षेप अथवा उजर सादर करावे. अन्यथा कोणाचेही उजर अथवा आक्षेप नाही असे गृहीत धरून वरील व्यक्तिंना सदर सानुग्रह अनुदान वाटप करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन सादर.

**जाहीर प्रगटन देणार**
**१) शेषाबाई काशीनाथ पंचडे**
**२) माहादप्पा शिवबसआप्पा पंचडे**
**३) गोदाबाई शिवबसआप्पा पंचडे**
**४) श्रीदेवी माहादप्पा पंचडे**
**५) संगमनाथ माहादप्पा पंचडे**
**सर्व रा. मारजवाडी ता. मुखेड जि. नांदेड**

## जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप

माझे पक्षकार व पपता श्री.अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान रा.निजाम कॉलनी,ता.जी.नाांदेड याांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबांधितांना या जाहीर प्रगटनाद्धारेव जाहीर आक्षेपद्वारे कळविण्यात येते की, माझा मुलगा आसरफ खान पि. अल्ताफ इलाही खान जो की त्याच्या कुटुांबासह ऑस्ट्रेललया देशात स्स्ट्ि आहे यांने दिनांक.०५ जुलै२०२५ रोजी दै.प्रजावाणी व दै.वरक ए ताजा मध्ये जाहीर प्रगटन दिलेले आहे की त्याने मला दि.२३/०८/२००२ रोजी दिलेले जनरल पावर आफ़ अटार्नी(GPA) क्र.२६५३/२००२ हे रद्द केलेले आहे. सदर जनरल पावर आफ़ अटार्नी(GPA) क्र. २६५३/२००२ ही स.द.ुनन.कार्यालय नाांदेड येथे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे म्हणुन कायद्यानुसार ते एक तर्फी जाहीर प्रगटन देऊन रद्द करता येत नाही. तसेच त्या GPA अधारे आरिफ खान याच्या नावाने असलेली कोणतीही मिळकत मी आतापयंत विक्री केलेले नाही, उलट माझ्या स्व कष्टाने कमावलेले काही मिळकत ती GPA क्रम २६५३/२००२ अधारे अरिफ खान याला मी गिफ्ट के लेली आहे व रउफ कॉलनी साांगवी नाांदेड येथील एक मजली दुकान आरिफ खान याच्या नावेखरेदी क्र.४११६/२०१७, स.द.ुनन. ०१ नुसार मी खरेदी के लेली आहे. जर ते GPA क्र. २६५३/२००२ रद्द झालेले असेल तर आरिफ खान याला मी करून दिलेले काही प्लॉटचे गिफ्ट व रउफ कॉलनी साांगवी नाांदेड येथील एक मजली मकानची मालकी ही आरिफ खानच्या नावाने रद्द समजण्यात यावी. जसे त्या GPA २६५३/२००२ अधारे आरिफ खान याच्या नावेकाही मिळकत मी गिफ्ट व खरेदी के लेली आहेतसेच त्या GPA क्र. २६५३/२००२ अधारे आरिफ खान याच्या नावे असलेले गिफ्ट व खरेदीला रद्द करण्याचे किंवा इतर कोणालाही ते गिफ्ट किंवा विक्री करण्याचे मला पूर्ण अधिकार आहे. माझा मुलगा आरिफ खान व ईरफान खान याांच्या कृत्यामुळे मला दु:ख व मानसिक त्रास झालेला आहे. मा.उच्च न्यायालयच्या एका आदेशान्वये जो मुलगा आपल्या पालकां विरूद्ध कट कारस्थान किंवा षडयंत्र किंवा त्यांना त्रास देत असेल त्या मुलाला करून दिलेले गिफ्ट परत घेण्याचे संपूर्ण अधिकार पालकांना आहेत तरी या जाहीर प्रगटना व जाहीर आक्षेप द्वारे सर्व जनतेस व सबंधीतांना वर नमुद तथ्य कळविण्यात येते

सबब हे जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप दि ०७/०५/२०२५.

**जाहीर प्रगटन देणार पक्षकार व पिता:**
**अल्ताफ इलाही खान पप.अहमद खान.**
**पक्षकाराचेअधिवक्ता व पक्षकाराचा मुलगा:**
**ॲड. आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान**
**मो.९१३०४४९४००**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# एकलारा-मुखेड-देगलूर रस्त्यासाठी शिवसेना ठाकरे गटाकडून होमहवन आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)**– देगलूर – मुखेडकडे जाणारा एकलारा, केरुरपर्यंतच्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावर अपघात नित्याचेच झाले असून नागरिकांना मरणयातना भोगाव्या लागत आहेत. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि. ९ जुलै रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यत एकलारा येथे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या नेतृत्वाखाली मंत्रोच्चारात ५१ पदाधिकाऱ्यांच्यावतीने होमहवन आंदोलन करण्यात आले. ईश्वरचरणी प्रार्थना करीत सदरील रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याची सुबुद्धी देवो अशी प्रार्थना करण्यात आली.




देगलूर – मुखेडकडे जाणारा एकलारा, केरुरपर्यंतचा रस्ता खराब झाल्याने दवाखान्यासह विविध कामांसाठी नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. वाहनांचे रोजच अपघात होत आहेत. काही जणांना अपंगत्व आले तर काहींचा जीवही गेलेला आहे. या संदर्भात मंत्री, लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना वारंवार भेटून, अर्ज, निवेदने दिली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबनराव बारसे यांच्या नेतृत्वाखाली एकलारा येथी रस्त्यातच होमहवन आंदोलन केले.

यावेळी सहसंपर्कप्रमुख भागवत जाधव, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, नांदेडचे तालुका प्रमुख सुनिल पाटील कदम, मुखेडचे तालुका प्रमुख उमेश पाटील आडलूरकर, नांदेड शहर संघटक पिन्टु सोनपे, मुखेड विधानसभा मतदारसंघ प्रमुख मन्मथ खंकरे मुक्रामाबादकर, मुखेड शहर प्रमुख शंकर चिंतम वाड, विधानसभा संघटक शंकर पिटलेवाड, युवा सेना तालुका प्रमुख बालाजी पाटील किटशेव, योगेश मामीलवाड, देगलूर युवा सेना तालुका प्रमुख तथा सोशल मीडिया तालुका प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, देगलूरचे सामाजिक कार्यकर्ते, धनाजी जोशी, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर, विधानसभा सम न्वयक सौ. सुनिताबाई वडजे, उपतालुकाप्रमुख विजय मंगलगे, शिवराज भुरे, जब्बार शेख आदीसह शेतकरी शेतमजूर शिवसैनिक, युवा सैनिक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तहसीलदार राजेश जाधव यांना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या हस्ते निवेदन देण्यात यावे.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक फड यांन चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. याप्रसंगी जिल्हा प्रमुख बबनराव बारसे, सहसंपर्कप्रमुख भागवत जाधव, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर, मुखेड तालुका प्रमुख उम ेश पाटील आडलूरकर आदींची भाषणे झाली. तालुका प्रमुख उमेश पाटील आडलूरकर यांनी या आंदोलनाचे आयोजन केले होते.

# स्मशानभूमीत विद्युत शवदाहिनी बसविण्यास ग्रामस्थांचा विरोध

**नांदेड (प्रतिनिधी)**– तरोडा (बु.) येथील जुनेगाव हद्दीतील स्मशानभूमीत नांदेड महानगरपालिकेच्या वतीने दलित वस्ती योजनेअंतर्गत नवीन विद्युत शववाहिनी प्रस्तावित आहे. विद्युत शवदाहिनी बसविल्यास हिंदू संस्कृतीचे जतन होणार नाही, असा आक्षेप घेत या विद्युत शवदाहिनीस तरोडा बु. येथील गावकऱ्यांनी विरोध केला. महानगरपालिकेवर मोर्चा काढून मनपा आयुक्तांना निवेदन दिले.



प्रस्तावित विद्युत शवदाहिनी नागरिकांना गैरसोयीची ठरणार आहे. एकतर जुनेगाव येथे एक स्मशानभूमी अगोदरच अस्तित्वात आहे. आता विद्युत शवदाहिनी बसवून नवीन दुसरी स्मशानभूमी उभारणे अयोग्य आहे. शिवाय ही प्रस्तावित विद्युत शवदाहिनी शहराच्या एका टोकास होणार असल्याने त्यापासून शहरातील इतर नागरिक वंचित राहतील. यासाठी विद्युत शवदाहिनी तरोडा बु. जनेगाव भागात न बसविता प्रभाक क्र. १ तरोडा खु. खडकतळे येथे महानगरपालिकेच्या जागेत बसविल्यास सोयीचे होईल. किंवा गोवर्धन घाट स्मशानभूमीत बसवावी. तरोडा बु. गावात स्म शानभूमीत हिंदू धर्मास अभिप्रेत असलेल्या चिता रचणे, मृतदेहास प्रदक्षिणा घालणे व अग्नी देणे या अंत्यसंस्काराच्या प्रथांवर घाला घालण्यात येऊ नये, असेही निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर शिवसेनेचे प्रथम नगरसेवक बाळासाहेब देशमुख तरोडेकर, हानमंत देशमुख, श्रीनिवास देशमुख, पुरभाजी दिपके, सचिन किसवे, देवानंद देशमुख, सुरज सोनेकर, बालाजी पाटील हुंबाड, गंगाधर मुळे, गजानन देशमुख, गुलाब देशमुख, पुंडलिक खोडे, गोपीनाथ देशमुख, संभाजी देशमुख यांच्यासह शेकडो गावकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांना

# पूर्णा-पटना एक्स्प्रेसमध्ये दोन डब्यांची तात्पुरत्या स्वरुपात वाढ



**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांची गर्दी पाहता दक्षिण मध्य रेल्वेने पूर्णा-पटना-पूर्णा एक्स्प्रेसमध्ये दोन डब्यांची तात्पुरत्या स्वरुपात वाढ करण्याचे ठरविले आहे.

गाडी क्रं. १७६१० पूर्णा-पटना एक्स्प्रेस मध्ये दोन तृतीय श्रेणी वातानुकुलीत (3C) चे डब्बे दि. १०, १७, २४ आणि ३१ जुलै रोजी पूर्णा येथून सुटणाऱ्या गाडीत तात्पुरत्या स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढीनंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

गाडी क्रं. १७६०९ पटना-पूर्णा एक्स्प्रेस मध्ये दोन तृतीय श्रेणी वातानुकुलीत (3C) चे डब्बे दि. १२, १९, २६ जुलै आणि २ ऑगस्ट रोजी पूर्णा येथून सुटणाऱ्या गाडीत तात्पुरत्या स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

# जिद्द व चिकाटीने अभ्यास केल्यास हमखास यश –उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीने अभ्यास केल्यास यश हमखास पदरात पडते, असे प्रतिपादन नांदेड ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी केले.



गुंजकर परिवार व दशलक्ष्मी सदन मुलींचे वसतीगृह नांदेडच्या वतीने कै. लक्ष्मीबाई दशरथराव गुंजकर यांच्या स्मरणार्थ अर्धापूर दहावी व बारावी परीक्षेत तालुक्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थिनींना उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांच्या हस्ते पारितोषिकं देण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्तमराव इंगळे उपस्थित होते.

यावर्षी बारावी परीक्षेत तालुक्यातून सर्वप्रथम आलेल्या कु. कल्याणी संदीप चिंतावार हिला ७ हजार रुपये रोख व प्रशस्तीपत्र, द्वितीय आलेल्या कु. मृदुला माणिकराव देशमुख हिला रोख ५ हजार रुपये व प्रशस्तीपत्र, तृतीय आलेल्या कुमारी मनीषा शिवानंद मरकुंदे हिला ३ हजार रुपये रोख व प्रशस्तीपत्र, तसेच दहावी परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या कु. संचिता सर्जेराव हळपादे हीला ५ हजार रुपये रोख व प्रशस्तीपत्र, द्वितीय आलेल्या कु. सृष्टी रवींद्र सूर्यवंशी हीला ३ हजार रुपये रोख व प्रशस्तीपत्र, तृतीय आलेल्या कु.साक्षी किशनराव शेटे हिला २ हजार रुपये रोख व प्रशस्तीपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले.

या गुणगौरव सोहळ्याला विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. गुंजकर परिवारांच्यावतीने यशस्वी विद्यार्थिनींना बक्षिसाचे वाटप या उत्साहवर्धक उपक्रमाचे पालक रवींद्र सूर्यवंशी यांनी स्वागत केले. संयोजक उदयकुमार गुंजकर, विजय गुंजकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# तुकाराम पांचाळ यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– सावरगाव नसरत (ता. लोहा) येथील ज्येष्ठ नागरिक तुकाराम नारायणराव पांचाळ (वय-८५) यांचे ९ जुलै रोजी सकाळी सिडको, नांदेड येथे निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, पाच मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सिडको, नांदेड येथील मयुरी फर्निचरचे माणिकराव पांचाळ, सूर्यकांत पांचाळ, चंद्रकांत पांचाळ, वसंत पांचाळ व शिल्पकार मंचक पांचाळ सावरगावकर यांचे ते वडील होत.

# गंगाधर कोटगिरे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– राहेगाव (ता. नांदेड) येथील सिध्देश्वर देवस्थानचे पुजारी गंगाधर श्रीराम कोटगिरे (वय-६०) यांचे ९ जुलै रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर बुधवारी दुपारी राहेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, जावई व एक मुलगा असा परिवार आहे. वृत्तपत्र विक्रेता प्रकाश कोटगिरे यांचे लहान बंधू व ओमकार कोटगिरे यांचे ते वडील होत.

# नापिकीला कंटाळून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील मौजे दगडसांगवी येथील तरुण शेतकरी तिरूपती दत्तात्रय बेराडे (वय ३२ वर्षे) या तरुण शेतकऱ्याने मंगळवारी दि. ८ जुलै रोजी सततच्या नापिकीला व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत माळाकोळी पोलीस स्टेशनमध्ये गुरनं २६/२५ नुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक बोबळे हे तपास करीत आहेत.

# दरोडाच्या तयारीत असलेली टोळी भोकर पोलिसांच्या जाळ्यात; एका अल्पवयीन मुलाचा समावेश

**नांदेड (प्रतिनिधी)** – पोमनाळा ते सावरगाव फाटा रस्त्यावर सोनारी शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या सहा जणांना भोकर पोलिसांनी अटक केली. त्यातील एक जण अल्पवयीन असून त्यांच्याकडून घातक शस्त्र जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई ८ जुलैच्या रात्री एकच्या सुमारास करण्यात आली.

पोमनाळा ते सावरगाव फाटा रस्त्यावर सोनारी शिवारात अंधाराचा दबा धरून दरोड्याच्या तयारीत असलेल्या चोरट्यांची टोळी थांबल्याची गोपनीय माहिती भोकर पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक अजित कुंभार व सहकाऱ्यांनी त्या ठिकाणी कारवाई केली असता गजानन उर्फ बाळा वसंत जळते (वय २४), उमेश गुणाजी आठवले (वय १९), विठ्ठल उर्फ विक्रम देवानंद सावते (वय १९), कृष्णा यशवंत पवार ( वय २०) रा. बारड, अजिंक्य गोविंदे वय २० रा. खैरगाव आणि एक अल्पवयीन मुलाला अटक केली. त्यांच्याकडून घातक शस्त्र व दरोड्याच्या गुन्ह्यात लागणारे आदी साहित्य जप्त करण्यात आले. हवालदार बालाजी लक्षटवार यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.




**नांदेड–** शहरातील माजी नगरसेविका नागाबाई भुजंगराव कोकाटे यांच्या आसना बायपास येथील भाजपा संपर्क कार्यालयात नविन पदाधिकारी चक्रधर पाटील कोकाटे (सरचिटणीस), रमेश पाटील कोकाटे (उपाध्यक्ष), गणेश खंदारे (उपाध्यक्ष), लखन जोंधळे (अध्यक्ष अनुसूचित मोर्चा), गणेश पाटील कोकाटे (अध्यक्ष किसान मोर्चा), निखिल पुरी अध्यक्ष (ओबीसी मोर्चा) यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा नेते दत्ता पाटील कोकाटे, माजी नगरसेवक प्रतिनिधी सदाशिव पुरी, माजी नगरसेवक उमेश पवळे, राम कोकाटे, अंकुश पाटील कोकाटे, प्रसाद कोकाटे, निखिल कोकाटे, सचिन खंदारे, आत्माराम कोकाटे, सत्यजित कोकाटे आणि श्याम कोकाटे आदी उपस्थित होते.

# घरफोडी करणारे अट्टल चोरट्यांना मुद्देमालासह अटक



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या करून सोन्या चांदीचा मुद्देमाल मित्रांमार्फत सराफा व्यापाऱ्यांना विकणाऱ्या अट्टल चोरट्यासह दोघांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चोरीत गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुरन ३२१/२०२५ कलम ३३१(४), ३०५ बि.एन.एस गुन्ह्यातील संशयीत आरोपी अभिजीत ऊर्फ अभय देवराव राऊत हा संशयीतरित्या भाग्यनगर ठाण्याच्या हद्दित फिरत असल्याची माहिती मिळताच त्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून गुरन १) ३२१/२०२५ बि.एन.एस कलम ३३१ (४), ३०५, ३१७(२) २) गुरन ३८७/२०२५ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ बी.एन.एस ३) ३९१/२०२५ कलम ३३१ (३), ३३१(४),३०५ बी.एन.एस मधील गेला माल त्याचा मित्र योगेश मारोती पवार (वय २० वर्षे व्यवसाय मजुरी रा. बरडशेवाळा ता. हदगाव) याच्याकडे ठेवल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार सदर आरोपीच्या घरातून वरील तिन्ही गुन्ह्यांमधील गेल्या मालापैकी सोन्या चांदीचे दागिने लॅपटॉप व दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्ह्याचा अधिक तपास भाग्यनगर पोलीस करीत आहेत. या आरोपीतांकडुन चोरीचे आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

# विनयभंग करणाऱ्या ऑटोचालकाला १६ तासांत अटक करून दोषारोपपत्र दाखल

## भाग्यनगर पोलिसांची कामगिरी

नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील भाग्यनगर पोलिसांनी मिशन निर्भया अंतर्गत महिला सुरक्षेबाबत एक महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. एका ऑटोचालकाने महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी, पोलिसांनी घटनेच्या १६ तासांच्या आत आरोपीला अटक करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

शनिवार, दि. ५ जुलै २०२५ रोजी सायंकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास श्रीनगर, नांदेड येथील पंचशील ड्रेसेससमोर एका महिलेचा ऑटोचालकाने विनयभंग केल्याची घटना घडली. ही घटना सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भाग्यनगर पोलिसांनी तात्काळ दखल घेतली.

त्यानंतर, नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी मिशन निर्भया अंतर्गत महिला व बाल सुरक्षा संबंधित गुन्ह्यांमध्ये तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार, भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखआली गुन्हे शोध पथकाने तात्काळ पीडित महिला आणि ऑटोचालकाचा शोध घेतला.

पथकाने सोशल मीडियावरील माहितीच्या आधारे पीडित महिलेचा शोध घेतला आणि त्यांच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४, ७५(२) अंतर्गत गुरनं-३९०/२०२५ नुसार गुन्हा दाखल केला. त्यानंतर, तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे यांनी ऑटो (MH-26/N-5057) चा चालक आरोपी शेख इम्रान शेख हरुनसाब (वय २४, रा. नवी आबादी, नांदेड) याला शोधून अटक केली. आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करून अवघ्या १६ तासांत न्यायालयात दोषारोप पत्रही दाखल करण्यात आले. यापूर्वी सिंदखेड, माहूर आणि रामतीर्थ पोलिसांनीही महिलांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये २४ तासांच्या आत दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी यापुढे ऑटोमधील महिला किंवा मुली प्रवाशांची कोणी छेडछाड करत असल्यास, तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा ११२ डायल करून तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. भाग्यनगर येथील पोलिसांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.

पान १ वरून...

**राजस्थानच्या चुरूमध्ये...**

जिल्हाधिकारी अभिषेक सुराना आणि स्थानिक पोलीस अधिकारी घटनास्थळी रवाना झाली आहे.

भारतीय हवाई दलाचे विमान का कोसळले याचे कारण नंतर स्पष्ट होईल. चुरुचे पोलीस अधीक्षक जय यादव यांच्या माहितीनुसार सैन्य दलाचे एक विमान दुर्घटनाग्रस्त झाले. ते विमान झाडावर कोसळले. त्यामुळं झाड देखील जळून गेलं. या ठिकाणी दोन मृतदेह आढळतात. दुर्घटनास्थळी हवाई दलाचे पथक दाखल झालं आहे. विमानाचा मलबा एकत्र करण्याचं काम केले जात आहे. भारतीय हवाई दलात १६० जग्वार विमाने आहेत. त्यापैकी ३० विमानांचा वापर प्रशिक्षणासाठी केला जातो.

दरम्यान आतापर्यंत घटनास्थळी एक मृतदेह आढळून आला आहे. मात्र जेव्हा अपघात झाला तेव्हा विमानात नक्की किती लोकं होते? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करून १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com